


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

MO.9860898564

संपादक - दिपक थोरात

वर्ष -०१ | अंक -७३ | शनिवार दि.०२ डिसेंबर २०२३ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रु | । पाने ४

Year-01 | Issue -73 | SATURDAY DT.02 DECEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4


**शिवसेनेने अनिल दादाला बाजूला करून स्वत:च्या उरात सोन्याची सुरी मारून घेतली**

**अनिल दादा जगताप सर्व सामान्य माणसाला मदतीला धावून येणारा नेता**

# दादा फायर है झुकेगा नहीं!

# ठाकरे साहेब ! आधीच खिळखिळी झालेल्या शिवसेनेचा जिल्हयात खुळखुळा करायचा की काय?

## थोडं थांबा!!!दादांशिवाय शिवसेना जिल्हयात अखंड 'निल'च राहणार, बीड जिल्हयाची नवीन कार्यकारिणी 'जग' पाहिल'ताप'दायकच ठरणार!

बीड /प्रतीनिधी

अनिल दादा जगताप हे शिवसेना वाढविणारा नेता आहे ज्यावेळेस बीड जिल्ह्यामध्ये शिवसेना ही सुरुवात झाली त्यावेळेस माजी जिल्हाप्रमुख स्वर्गीय विजय अण्णा बहीरर यांनी शिवसेनेचे कार्य करत शिवसेना वाढविण्याचे काम केले आज सुद्धा स्वर्गीय विजय अण्णा बहिर यांचे नाव शिवसेना म्हटलं की सर्वसामान्यांच्या ओठावर येणारे नाव आहे. याच बीड जिल्ह्यातील शिवसेनेने दगड जरी उभा केला तरी त्याला देव मानून मतदान करणारे मतदार आज सुद्धा बीड मतदार संघामध्ये मोठ्या प्रमाणात आहेत तर यावेळी बीडमध्ये जेव्हा जेव्हा शिवसेना उभा राहिली त्यावेळेस शिवसेनेला आमदार मंत्री बीड जिल्ह्याने दिलेले आहेत तर माजी मंत्री सुरेश नवले माजी आमदार बाजीराव जगताप माजी आमदार सुनील धांडे हे बीड जिल्ह्यामध्ये आमदार मंत्री म्हणून निवडून आलेले आहेत यानंतर जिल्हाप्रमुख म्हणून चंद्रकांत नवले सुनील धांडे किशोर उबाळे बाळासाहेब पिंगळे जयदेव चाटे आप्पासाहेब जाधव सचिन मुळूक कुंडलिक खांडे अनिल दादा जगताप यशस्वीरित्या शिवसेना चालवून पक्षाला बळ दिले

परंतु यामध्ये माजी मंत्री सुरेश नवले हे फुटले नंतर नारायण राणे यांच्यासोबत त्यांनी काँग्रेसमध्ये गेले यानंतर माजी आमदार सुनील धांडे हे फुटून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटांमध्ये प्रवेश केला त्यानंतर सुरेश नवले यांचे बंधू हे सुद्धा काँग्रेसमध्ये गेले यानंतर कुंडलिक खांडे सचिन मुळे यांनी शिंदे गटात प्रवेश करत शिवसेनेचे काम जोमाने सुरू केले.

पण शिवसेनेचा सामान्य कार्यकर्ता ते आजपर्यंत सर्वसामान्य माणसाला जोपासत काम करणारा एकनिष्ठ वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचा कार्यकर्ता म्हणून स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारावर चालणाऱ्या शिवसेनेचा झेंडा शेवटपर्यंत आपल्या खांद्यावर घेत काम करणारा आमचा अनिल दादा जगताप हा बीड जिल्ह्यातील

**ठाकरे साहेब आपणांला 'अंधारात' ठेवूनच 'जाम' कार्यक्रम ठरलाय असं दिसतयं!**

जनतेच्या भावनांमध्ये घर केलेला एक सर्वसामान्य शिवसैनिक नव्हे तर या बीडच्या आमदार मंत्राला जे काम होत नाही ते आणि दादा स्वतःच्या हिमतीवर व गोरगरिबांच्या मदतीला जाऊन त्या गोरगरिबाची मदत करतात अशी भावना बीड जिल्ह्यातील जनतेची आहे परंतु याचाच एक भाग म्हणजे काल जो प्रकार बीडमध्ये झाला एका शिवसेनेच्या मुखपत्रातून त्या ठिकाणी बीडच्या जिल्हाप्रमुख पदी तीन जिल्हाप्रमुख यांची निवड झाल्या यामध्ये गणेश वरेकर परमेश्वर सातपुते रत्नाकर शिंदे यांना पद देण्यात आली यांना पद देत असताना अनिल दादा यांना पदोन्नती देऊन सहसंपर्क करण्यात आले तर यावेळी बाजार पंडित यांना सुद्धा संपर्कप्रमुख पदी निवड करण्यात आली परंतु या ठिकाणी अनिल दादा जगताप यांनी बीड शहरांमध्ये ज्या येणाऱ्या बीड नगरपालिकेमध्ये जे मतदान होणार होते. ते मतदान बीड नगर अध्यक्ष पदासाठी महत्त्वाचे



होते बीड नगरपरिषदेमध्ये झेंडा फडकविण्याचे काम आणि दादांमुळे होणार होते परंतु हे स्वप्न आता शिवसेनेला फक्त पहावा लागणार आहे यामुळे बीड शहरातील नागरिकांसह जिल्ह्यातील नागरिकांनी दादांच्या पाठीशी उभे आहेत यामध्ये आमचे अनिल दादांनी काय चूक केली होती पक्षाने अनिल दादांना अंधारात ठेवून संबंधित निवडी केलेल्या आहेत असाही आरोप शिवसैनिकांमधून तसेच बीड जिल्ह्यातील जनतेन मधून होत आहे यामध्ये अनिल दादा जगताप यांच्या पाठीशी संपूर्ण बीड जिल्हा आहे बीड जिल्ह्यामध्ये अनिल दादा जगताप यांना बाजूला ठेवून नवीन तीन जिल्हाप्रमुख देणे म्हणजे शिवसेनेने स्वतःच्या उरात सोन्याची सुरी मारून घेतली आहे. ज्यांना ग्रामपंचायत आणता आली नाही ते आमदार काय निवडून आणणार?विसापूर बीड तालुक्यातील बाबुळवाडी गाव मध्ये ग्रामपंचायत ची निवडणूक झाली या ग्रामपंचायतमध्ये ज्या पदाधिकाऱ्यांना स्वत:ची

**'सात' जन्म 'साथ' देणाऱ्या निष्ठावंत 'परमेश्वरा'ला डावलणे महागात पडेल!**


ग्रामपंचायत आणता आली नाही त्या पदाधिकाऱ्यांना जिल्हाप्रमुख पद पक्षाने दिले आहे. विशेष म्हणजे ज्या पदाधिकाऱ्याला स्वत:ची ग्रामपंचायत आणता आली नाही तो पदाधिकारी आमदार काय निवडूण आणणार? असा संतप्त सवाल सच्चे शिवसैनिक उपस्थित करत आहेत. पक्षाने केलेल्या निवडीचा पुनश्च एकदा विचार करावा व दादांसारख्या सच्चा कार्यकर्त्याला बळ देण्यासाठी परत दादांनाच पुन्हा जिल्हाप्रमुख पदी अशी सुद्धा मागणी शिवसैनिकांची आहे यावेळी शिवसैनिक आक्रमक होत आहेत.बीड मतदारसंघासह जिल्हाभरात शिवसेनेचं जाळं निर्माण करून तोच दरारा जिल्ह्यात निर्माण करण्यासाठी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप मोर्चेबांधणी करत होते. त्यांच्या नेतृत्वाखाली परत जिल्ह्यामध्ये शिवसैनिक एकवटत होता. बीड मतदारसंघामध्ये २०२४ मध्ये भगवा फडकवण्यासाठी अनिलदादांनी पूर्ण यंत्रणा पनाला लावली होती. एकीकडे एवढे सगळे असताना नगरपालिका सुद्धा ताब्यात घेण्यासाठी अनिलदादा मोर्चेबांधणी करत होते परंतु आज अचानक पक्षाच्या वतीने नवीन तीन जिल्हाध्यक्षांची निवड करण्यात आल्या यामध्ये वरेकर शिंदे सातपुते यांची निवड करण्यात आलेली आहे परंतु ही निवड शिवसैनिकांना मान्य नाही म्हणून जी आणि दादांनी शिवसेनेची मूठ बांधली होती ती मूठ कायम राखत शिवसेना आणि दादा जगताप यांचीच आहे हे पुन्हा एकदा सिद्ध होणार आहे कारण बीड जिल्ह्यातील मतदार हा अनिल जगताप यांना मानणार आहे.बीड जिल्ह्यातील शिवसेना ही आजपर्यंत बीड जिल्ह्यामध्ये जेव्हा जेव्हा विधानसभा लोकसभा झाली त्या शिवसेनेचे ३० ते ४० हजार मतदान हे फिक्स असल्यामुळे स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे विचारवंत चालणाऱ्या शिवसेनेला अनिल दादा जगताप यांच्यासारखा कार्यकर्ता लाभला होता अनिल दादा यांची ताकद ही पन्नास हजार मतदान घेण्याची आहे यावेळी अनिल दादा यांनी बीड नगरपरिषद पंचायत समिती जिल्हा परिषद बीड विधानसभेवर झेंडा फडकविण्याची तयारी तयारीत असताना संबंधित जिल्हा प्रमुख अनिल दादांना अंधारात ठेवून मध्ये निवडी करण्यात आले आहेत यामुळे मतदार संघामधील शिवसैनिक निवेद्य सामान्य जनता सुद्धा नाराजीचा सुरू होत आहे यावेळी नक्कीच शिवसेना उद्धव ठाकरे गट यांनी स्वतःच्या सोन्याची उरात सुरी मारून घेतली आहे नक्कीच शिवसेनेचा या ठिकाणी बळी जाईल व आणि दादा सारखा कार्यकर्ता आज सुद्धा आमदारकीच्या पदाला शोभणारा माणूस आहे असं बीड जिल्ह्यातील जनता सांगत आहे तर अनिल दादा जगताप यांच्या पाठीशी बीड जिल्ह्यातील जनता सदैव उभी आहे हे मात्र या कालच्या निवडीमुळे बीड जिल्ह्यातील चर्चेला उधाण आलेले आहे.फायर ब्रिगेड शिवसेनेच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी शिवसेनेचे सूत्र सांभाळायला सुरुवात केल्यानंतर शिवसेनेमध्ये मोठा फेरबदल करण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे तर शिवसेनेच्या सुषमाताई अंधारे यांनी शिवसेनेमध्ये पक्ष प्रवेश करण्याच्या अगोदर चे सर्व स्टेटमेंट काय आहेत हे तपासणी गरजेचे आहे असेही काही शिवसैनिकांकडून सांगण्यात आलेले आहे परंतु सुषमाताई अंधारे यांनी आप्पासाहेब जगताप यांच्याही पदाबाबत जिल्हाध्यक्ष पदावरून पायउतार होण्यासाठी व काढण्यासाठी त्या सदैव कटिबद्ध होत्या आप्पासाहेब जाधव यांनी सुद्धा शिवसेना वाढवली होती परंतु सुषमाताई अंधारे यांनी एका कार्यक्रमांमध्ये त्यांच्यासोबत भांडण करून त्यांच्यावरती आरोप करत शिवसेनेतून हकालपट्टी करण्यात आली होती परंतु आप्पासाहेब जाधव यांनी सुद्धा सुषमाताई अंधारे यांच्या कानात दोन लगावल्या असे जाहीर येथे व्हिडिओद्वारे सांगितले होते शिवसेना बीड जिल्ह्यामध्ये वाढणार नाही तर संपणार आहे असे शिवसैनिक म्हणत आहेत उद्धव ठाकरे गटाचे नेतेमंडळी यांनी लवकरच आदित्य ठाकरे यांच्याकडे व माननीय उद्धव साहेब ठाकरे यांच्याकडे भेट घेणार असल्याचे सांगितले आहे

## सलग तिसऱ्या दिवशी पाऊस, ज्वारी भुईसपाट, कापूस भिजला

प्रतिनिधी बीड

**जिल्ह्यात १३.५ मिमी पाऊस पाटोद्यात सर्वाधिक २८.२ मिमी नोंद**

बीड : जिल्ह्यात शुक्रवारी पहाटे सलग तिसऱ्या दिवशी अवकाळी पावसाने हजेरी लावली. जिल्ह्यात एकूण १३. ५ मिमी पावसाची नोंद झाली असून पाटोदा, आष्टी, बीड आणि शिरूर तालुक्यात सर्वाधिक पाऊस झाला आहे. पाटोद्यात २८.२ मिमी पावसाची नोंद झाल्याचा हवामान विभागाचा अहवाल आहे. दरम्यान, यामुळे ज्वारी, ऊस आडवा झाला असून कपाशीच्या वाती झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांनी शुक्रवारी बीड तालुक्यातील नुकसानग्रस्त भागाला भेट देऊन पाहणी केली.



जिल्ह्यात मागील तीन-चार दिवसांपासून अवकाळी पावसाने हजेरी लावण्यास सुरुवात केली आहे. खरीप हंगामात वरुणराजाने पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. पिकांची वाढ खुंटली होती. त्यामुळे शेतकऱ्यांना अग्रिम पीक विमा देण्यात आला होता.परतीचा पाऊसही यंदा पडला नाही. त्यामुळे रब्बी पेरण्यांवरही परिणाम झाला होता. ज्या शेतकऱ्यांकडे सिंचन सुविधा उपलब्ध आहे त्यांनी ज्वारी व इतर पिकांची पेरणी केली होती. दरम्यान, मागील तीन-चार दिवसांपासून जिल्ह्यात अवकाळी पाऊस बरसत आहे. या पावसाचा फटका उगवून आलेल्या पिकांना बसला आहे. टंचाईग्रस्त भागाला व उगवून न आलेल्या पिकांना याचा फायदा होणार आहे. ज्वारी, ऊस व कपाशीला अधिक फटका बसला आहे. ज्वारी, ऊस आडवा झाला असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे तर कपाशीच्या वाती झाल्या आहेत.

## छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी नाका सिमेंट रस्ता,नाली व बिंदुसरा नदीवरील पुल लवकरच होणार

**आ.संदीप क्षीरसागरांच्या प्रयत्नातून ४४ कोटी रूपयांचा निधी मंजूर**

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी नाका पर्यंतचा मुख्य रस्त्याची निविदा प्रसिद्ध झाली असून शहरातील हा मुख्य असलेला अडीच किलोमीटर अंतराचा रस्ता आता सुसज्ज होणार आहे. या रस्ता, बिंदुसरा नदीवरील पुल कामासाठी एकूण ४४ कोटी रूपयांचा भरघोस निधी मंजूर झाला आहे. या कामाच्या मंजुरीसाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले आहे.

मागील टप्प्यातच जरूड ते बार्शी नाका व छत्रपती शिवाजी महाराज चौक ते शिरापूर धुमाळ या रस्त्यांसाठी तब्बल २१३ कोटी रूपयांचा निधी आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेला आहे. उर्वरित बार्शी नाका ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यंतचा रस्ता नव्याने व्हावा याकरिता आ.क्षीरसागर गेल्या अनेक दिवसांपासून प्रयत्नशील होते. याबाबत केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्री नितीन गडकरी, महामार्ग विकास प्राधिकरण यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा, मागणी करून



शेवटी या रस्त्याला मंजुरी मिळाली आहे. छक३६१ ऋ (उक ४७+००० ढे उक ४९+५०० ढे त्रंी डरपश) २.५ (अडीच) किलोमीटर लांबी व चौपदरीकरण आणि नाली बांधकाम व बिंदुसरा नदीवरील पुल बांधणे अशा स्वरुपातील हे काम असणार आहे. राष्ट्रीय रस्ते विकास प्राधिकरण व राष्ट्रीय महामार्ग विभाग यांच्याकडून याकामासाठी ४४ कोटी ४८ लाख रूपयांचा निधी मंजूर झाला आहे. सदरील कामाची निविदा सध्या प्रसिद्ध झाली असून लवकरच कामाला प्रत्यक्ष सुरूवात होणार आहे. या रस्त्याच्या मंजुरी व निधीसाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्री नितीन गडकरी व राष्ट्रीय रस्ते विकास प्राधिकरण यांनी सहकार्य केल्याबद्दल आभार मानले आहेत.

## माझ्यासमोरच अजित पवारांनी प्रकाश सोळंकेना 'तो' शब्द दिला; आता जयंत पाटलांनी सांगितला घटनाक्रम!

प्रतिनिधी पुणे

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेल्या धक्कादाय खुलाशानंतर अजित पवार गट आणि शरद पवार गटात कलगीतुरा रंगला आहे. अजित पवार यांनी आमदार प्रकाश सोळंकेंवरून केलेल्या दाव्यानंतर आता राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनीही खुलासा करत अजित पवार यांना टोला लगावला आहे.

प्रकाश सोळंकेवर जयंत पाटील काय म्हणाले?

जयंत पाटील यांनी सांगितले की, त्यांना (प्रकाश सोळंके) मंत्रीच व्हायचं होत. मला मंत्री का केलं नाही म्हणून ते चिडून आले. ते राजीनामा देत होते, पणं मी त्यांना बोलावलं. त्यावेळी अजित पवारांनी माझ्यासमोरच सोळंखीना सांगितले की तुम्हाला पक्षाचे कार्याध्यक्ष पद देतो, पण नंतर मला कधी पक्षाने तसे सांगितल नाही. मला सांगितलं असतं तर मी राजीनामा दिलाच असता.

जिव्हाळा असता तर त्यांनी प्रकाश याना मंत्री केलं असतं

ते पुढे म्हणाले की, सोळंके यांची नाराजी दूर करण्याची संधी अजित पवार यांना आली होती. आता नऊ मंत्र्यांनी शपथ घेतली त्यावेळी बीड जिल्ह्यातून प्रकाश सोळंके यांच्याबद्दल जिव्हाळा असता तर त्यांनी प्रकाश याना मंत्री केलं असत, असा टोलाही



लगावला. प्रकाश सोळंके आमच्याकडे आले तर आम्ही त्यांचं गणित बसवूच, पण मला माहित नाही ते येतील की नाही.

शरद पवार राजीनामा/आंदोलनावर काय म्हणाले?

शरद पवार यांच्या पक्षाध्यक्षपदाच्या राजीनाम्यावर बोलताना जयंत पाटील यांनी सांगितले की, त्याविषयी मला काही माहिती नाही. आंदोलन, राजीनामा असं काही ठरलेलं नव्हतं. आंदोलन करा असं कोणी कोणाला आदेश दिले नव्हते. शरद पवारांनी गाफील ठेवलं याबाबत त्यांनी बोलण्यास नकार देताना मी आता बोलायची आवश्यकता नाही, निवांत बोलेन कधी तरी, असे सांगितले.

त्यांचा पक्ष वेगळा झाला आहे, त्यांना काही जागा लढवाव्या लागतील. काही मतदारसंघात ते लढतील, पण ते खरंच लढवणार की लढवल्यासारखं दाखवणार हे बघायचं, असा टोलाही त्यांनी लगावला.

# अश्लील व्हिडिओ प्रकरणामुळे मिल्लिया हायस्कूलमध्ये मोबाइल वापरास बंदी

## माध्यमिक शिक्षणाधिकारी चौकशी समिती नियुक्त करून अहवाल मागवणार

प्रतिनिधी | बीड

बीड : बीडमधील मिल्लिया हायस्कूलमधील अश्लील व्हिडिओप्रकरणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांनी माध्यमिक शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांना गोपनीय चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान, शिक्षणाधिकारी शिंदे यांनी मिल्लिया गर्ल्स शाळेला या प्रकरणात १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. दुसरीकडे माध्यमिक शिक्षणाधिकारी हे या प्रकरणात चौकशी समिती नियुक्त करणार असून या समितीकडून आलेला अहवाल मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देणार आहेत.

अंजुमन इशात ए तालीम बीड संचलित बीडच्या मिल्लिया कन्या हायस्कूलमध्ये एकूण ३६ शिक्षक-शिक्षिका कार्यरत असून त्यात ११ शिक्षक आणि २४ शिक्षिका आहेत. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांत तीन लिपिक, एक लॅब असिस्टंट व अन्य तीन सेवक आहेत. मिल्लिया मुली व मुलांच्या माध्यमिक विद्यालयातील अश्लील व्हिडिओ प्रकरणाने खळबळ उडाल्यानंतर गुरुवारपासून संस्थेने पालकांच्या विविध मागण्या मान्य करून विद्यार्थ्यांना शाळेत पाठवण्यासंबंधी ठोस पाऊले उचलली आहेत. या शाळेतील शिक्षक, शिक्षिकेच्या निलंबनानंतर अंजुमन इशात ए तालीम बीड ही संस्था एक संस्थेचा प्रतिनिधी, मुख्याध्यापक व राज्य किंवा राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक यांची चौकशी समिती गठित करणार आहे. तत्कालीन मुख्याध्यापक समितीत सदस्य म्हणून राहणार आहे. दोषी शिक्षकाच्या वतीने एक प्रतिनिधी दिला जावा, असे सांगण्यात आले आहे.

सायबर क्राइमची तक्रार दिली जाणार

सध्या बीडमध्ये सोशल मीडियावर



अश्लील व्हिडिओ, ऑडिओ, फोटो व्हायरल होत असून त्याची कारणे शोधण्यासाठी शाळेतील प्रशासन व व्यवस्थापन समितीच्या व्यक्तीकडून सायबर क्राइमची तक्रार दिली जाणार आहे.

गर्ल्स हायस्कूलच्या वर्गखोल्या, ग्रंथालयात बसवणार आता सीसीटीव्ही कॅमेरे

अंजुमन इशात ए तालीम बीड संस्थेच्या मिल्लिया गर्ल्स शाळेतील वर्गखोल्या, प्रयोगशाळेत, ग्रंथालय येथेही सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसवले जात आहेत. मिल्लिया मुलींची व मुलांच्या शाळेच्या प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षक तैनात करण्यात येणार आहेत. ओळखपत्राशिवाय कोणत्याही विद्यार्थ्याला प्रवेश दिला जाणार नसल्याचे संस्थेने कळवले आहे.

शैक्षणिक सहल तसेच वार्षिक स्नेहसंमेलन आता घेणार नाही

मोबाइल वापरास शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थ्यांना मिल्लिया शाळेच्या परिसरामध्ये शाळेच्या वेळेत शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांना देखील मोबाइल वापरण्यास सक्त बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला असून पहिली ते वरिष्ठ महाविद्यालयापर्यंत शैक्षणिक सहल, वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन केले जाणार नाही.




# अजित पवारांकडून लोकसभेच्या ४ जागा जाहीर

प्रतिनिधी | पुणे

पुणे : राष्ट्रवादी काँग्रेसमधून बाहेर गेलेल्यांकडून पुन्हा प्रश्न उपस्थित केले गेले आहेत, त्याचा फारसा विचार करण्याची गरज नाही. लोकांकडे गेल्यानंतर प्रश्न विचारतील म्हणून आपल्यावर हल्ले करा आणि मुळ मुद्यांवर दुर्लक्ष करा, असा प्रकार सुरु आहे. त्यामुळे फारसा विचार करण्याची गरज नाही, आम्ही विचारांशी बांधिल आहोत, संधीसाधू नाही, अशा मोजक्याच शब्दात शरद पवार यांनी अजित पवारांवर तोफ डागली.

अजित पवार यांनी कार्यकर्त्यांच्या शिबिरात बोलताना शरद पवारांवर गंभीर आरोप केले होते. त्याचबरोबर लोकसभा निवडणुकीसाठी चार जागाही घोषित केल्या आहेत. यामुळे आरोपांना आणि अजित पवार गटाच्या भूमिकेवर शरद पवार काय उत्तर देणार? याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष होते. शरद पवार यांनी पुण्यात बोलताना अजित पवारांच्या वक्तव्याचा समाचार घेतला. तुमचा कार्यक्रम काय होता, तुम्ही कुणाचं नेतृत्व स्वीकारलं होतं आणि आता कुणासोबत गेला आहात, अशी प्रश्न लोक विचारणार, म्हणून आमच्यावर हल्ला करत आहेत, असा टोलाही शरद पवार यांनी लगावला.

शरद पवार यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, सामान्य लोकांमध्ये भूमिका मांडण्याची गरज आहे. भीती बाळगण्याचे काही कारण नाही. जे काही घडलं त्याची चिंता करण्याची गरज नाही, उलट संघटना स्वच्छ झाली नवीन लोकांना संधी मिळाली आहे. विधानसभा जाहीर होतील तेव्हा राष्ट्रवादीची नवी फळी तयार होणार आहे, असा विश्वास त्यांनी कार्यकर्त्यांना दिला.

# वारकरी संप्रदायाकडून देहू बंदची हाक तर दोन दिवसांनी महाराष्ट्रही बंद करणार

प्रतिनिधी | बीड

देहू, पुणे : जगद्गुरू संत तुकाराम महाराज देवस्थानचे विश्वस्त ग्रामस्थांसह आमरण उपोषणाला बसलेत. चौथा दिवस उजाडला तरी सरकारने या उपोषणाकडे डोकावून ही पाहिलं नाही. म्हणूनच देहूकर आता आक्रमक झालेले आहेत. उद्या देवस्थान आणि ग्रामस्थांनी देहू बंदची हाक दिली आहे. परवा देहूतील मार्ग चहुबाजूंनी बंद केली जाणार आहेत. त्यानंतर ही सरकार जागं झालं नाही तर वारकरी सांप्रदाय महाराष्ट्र बंद ठेवण्याच्या तयारीत आहे.




सरकार देहूतील ५० एकर गायरान जागा पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाला देण्याचा घाट घातला आहे. ही जागा वारकरी सांप्रदायासाठी आणि गावच्या विकासासाठी द्यावी. अशी मागणी मान्य होत नसल्यानं देहूतील मंदिरासमोर आमरण उपोषण सुरु आहे. तरी ही सरकारला कीव येईना म्हणूनच उद्या देहू बंदची तर पुढे महाराष्ट्र बंद करण्याची तयारी वारकरी सांप्रदयाने केलेली आहे.

वारकऱ्यांचं काय म्हणणं आहे?

या बंद नंतरही जर सरकारने आमच्याकडे लक्ष दिलं नाही तर आम्ही राज्यातलं प्रत्येक गाव बंद करु असा इशारा वारकऱ्यांकडून देण्यात आला आहे. राज्यभरातून आम्ही पाठिंबा मागणार आहोत. आयुक्तालयाता दिलेली जागा देहूत आलेल्या वारकऱ्यांसाठी, किर्तनासाठी जागा उपलब्ध करुन द्यावी. या जागेत विठुनामाचा गजर होईल, मात्र सरकारने या जागेवर आयुक्तालयाला देण्याचा घाट घातला आहे.त्याला विरोध करण्यासाठी ४ दिवसांपासून उपोषण करत आहोत. सरकारने आमच्याकडे लक्ष द्यावं नाहीतर महाराष्ट्र बंदची हाक देऊ, असा इशारा वारकऱ्यांनी दिला आहे.

सरकारलं दुर्लक्ष केलं म्हणून पुन्हा वारकरी आक्रमक...

काही दिवसांपूर्वी श्री क्षेत्र देहूची गायरान जमीन पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयास देण्यास आज श्री संत तुकाराम महाराज संस्थान विश्वस्त आणि देहूतील नगरसेवकांनी रस्त्यावर उतरून विरोध केला होता. ग्रामस्थांनीही सहभाग घेतला होता. 'देहू बंद'ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. गायरान हे नगरपंचायत इमारत आणि राज्यभरातून येणाऱ्या भाविकांच्या दृष्टीने रुग्णालय व निवास व्यवस्था यासाठी लागणार आहे.देहूत वर्षभरात तुकाराम बीज, संत तुकाराम पालखी सोहळा व अन्य सोहळ्याच्या निमित्ताने दहा ते पंधरा लाख भाविक येतात. त्यांच्यासाठी ही जागा हवी आहे, असं म्हणत नगरसेवक रस्त्यावर उतरले होते. मात्र त्यावेळी या आंदोलनाला सरकारनं गांभीर्यानं घेतलं नाही. त्यामुळे वारकऱ्यांनी पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेतली आहे.

# काडीवडगांवात अज्ञात चोरट्यांचा वावर !

## एका ठिकाणी प्रयत्न, दुसर्या ठिकाणी मोबाईल तर तिसर्या ठिकाणाहून २५ हजार चोरीला



प्रतिनिधी | वडवणी

वडवणी :- चार ते पाच अज्ञात चोरट्यांचा वावर दिसून आला असून तीन ठिकाणी चोरीचा चोरीचा डाव फसला आहे. या घटनेतील चोरटे सीसीटिव्ही कॅमेर्यात कैद झाले आहेत तर सदरील फुटेज देखील पोलीसांकडे सपूर्त केले असून हि घटना वडवणी तालुक्यातील मौजे काडीवडगांव येथे काल मध्यरात्री घडली आहे. या प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

वडवणी तालुक्यातील मौजे काडीवडगांव येथील रहिवाशी आसणारे शेतकरी विश्वास बन्शीधर बादाडे यांच्या घराशेजारील असणाऱ्या गोठ्यामधून दोन ते चार दिवसांपुर्वी गाय चोरीला गेली आहे या प्रकरणी गुन्हा देखील नोंद करण्यात आला आहे आणि यांच्याच घरी दि.३० नोंव्हेबरच्या मध्यरात्री १२ वाजण्याच्या सुमारास पुन्हा अज्ञात चोरट्यांनी घरी मुख्य गेटच्या प्रवेशाद्वारातून घरात प्रवेश केला परंतु मुख्य घराचे दोन्ही दरवाजे चोरट्यांना तुटले नसल्याने अज्ञात चोरट्यांचा चोरी करण्याचा डाव याठिकाणी फसला आहे. यामध्ये अज्ञात चार ते पाच चोरटे असून याठिकाणी सीसीटिव्ही कँमेरे असल्याने सीसीटिव्ही कँमेरामध्ये कैद झाले आहेत. तर याच वेळी व्यकंट आसाराम बादाडे यांच्या घरी देखील चोरट्यांनी प्रवेश केला हे घरात एकटे असल्याने यांचा फायदा घेत तोंडावर गुंगीचा स्प्रे मारला व घरात ढुडाळा घेतला असता घरात काहीच मिळून न आणाल्याने घरातील दोन मोबाईल चोरटे घेऊन गेले आहेत.तर याप्रकरणी एक मोबाईल चोरीला गेला असल्याचा वडवणी पोलीसांत फिर्याद देखील दिली आहे. यानंतर महादेव काशीनाथ हतागळे यांच्या घराला देखील चोरट्यांनी लक्ष केले होते यांची वयोध्द आई एकटीच घरात राहत असल्याचा फायदा घेत चोरट्यांनी घरात प्रवेश केला आणि या घरातील २५ हजार रुपये ठेवलेले पैसे चोरट्यांनी चोरून घेऊन गेले आहेत.तर या प्रकरणातील कोणतेच पुरावे नसल्याने फक्त व्यकंट आसाराम बादाडे यांच्या फिर्यादीवरुन मोबाईल चोरील गेला असल्याच्या कारणाने वडवणी पोलीसात अज्ञात चोरट्यां विरोधात गुन्हा दाखल केला आहे. तर या प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण पसरले असून सदरील प्रकारातील सीसीटिव्ही कँमेरातील फुटेज पोलीसांच्या ताब्यात देखील देण्यात आले आहे.

### तपासात उघड होईल - एपीआय

या प्रकरणी मोबाईल चोरीला गेल्याची तक्रार घेतली आहे. या प्रकरणी सीसीटिव्ही कँमेरतील फुटेज देखील ताब्यात घेतण्यात आले असून तपासात जे निष्पण होईल त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल तसेच या प्रकरणाचा तपास करण्यात येईल अशी प्रतिक्रिया वडवणी पोलीस स्टेशनचे एपीआय अमन सिरसट यांनी दिली आहे.

# शेवगाव दंगलीचे प्रायोजक शेवगाव पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांची एस आय टी कडून चौकशी करा !

## अरुण मुंढे यांची आज पत्रकार परिषदेत मागणी

### शेवगाव मध्ये पोलीस निरीक्षकाच्या निलंबनासाठी ४ तारखेला सर्वपक्षीय मोर्चा

अहमदनगर (प्रशांत बाफना)

शेवगाव दंगलीचे प्रयोजक तत्कालीन पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांची एस आय टी कडून चौकशी करा तसेच माझ्यावर नोंदलेले खोटे वाळू चोरीचे गुन्हे तत्काळ मागे घेण्यात यावेत. अशी मागणी भाजपाचे प्रदेश सरचिटणीस अरुण मुंढे यांनी आज शेवगाव मध्ये पत्रकार परिषद घेऊन मागणी केली. शेवगाव पोलीस निरीक्षक यांच्यावर कारवाई करण्यासाठी शेवगाव मध्ये सोमवारी ४ डिसेंबर रोजी सर्वपक्षीय मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती आज आणून मुंढे यांनी पत्रकार परिषदेमध्ये केली. . आज शनिवार दि ०२ रोजी अरुण मुंढे यांच्या निवासस्थानी पार पडलेल्या पत्रकार परिषदेमध्ये सोमवारी होणाऱ्या मोर्चाचे आयोजन कशाप्रकारे असेल ही माहिती पत्रकारांना दिली. सोमवारी ४ डिसेंबर रोजी स्वर्गीय लोकनेते गोपीनाथ मुंढे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून हा मोर्चा गोपीनाथ चौकातून निघणार असल्याचे त्यांनी सांगितले. या मोर्चासाठी शेवगाव मधील सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे ही अरुण मुंढे यांनी आव्हान केले आहे.या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना अरुण मुंढे यांनी तत्कालीन पोलीस निरीक्षकांवर गंभीर आरोप केले. मुंढे म्हणाले की शेवगाव मध्ये काही दिवसांपूर्वी घडलेली दंगल ही शेवगाव पोलीस निरीक्षक यांनी घडवून आणली. यामधून त्यांनी कोटी रुपयांची माया जमा केली. ह्या जमा केलेल्या संपत्तीची चौकशी यासाठी कडून केली जावी अशी मागणी मुंढे यांनी केली. तसेच प्रशिक्षणार्थी आयपीएस रेड्डी हे शेवगाव मधून बदलून गेल्यानंतर अवैध धंदे वाल्यांची बैठक बोलावून शेवगाव पोलीस निरीक्षकांनी सर्व अवैध धंदे पुन्हा चालू केले. त्यामुळे शेवगावच्या सुरक्षितेचा प्रश्न पुन्हा निर्माण झाला. याबाबत वारंवार तक्रारी करूनही अहमदनगर जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी याकडे जाणीवपूर्वक डोळे झाक केली. त्यामुळे शेवगाव तालुक्यातील जनतेला अनेक खोट्या गुन्ह्यांमध्ये गोवण्याचे षडयंत्र पोलीस निरीक्षकांनी केले. असे गंभीर आरोप यावेळी अरुण मुंढे यांनी शेवगाव पोलीस निरीक्षक यांच्यावर केले.

# कु.गायत्री बोरकर ची राष्ट्रीय खो-खो स्पर्धा साठी निवड

प्रतिनिधी | बीड



मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ छ. संभाजी नगर संचलित न्यू हायस्कूल गेवराई शाळेची खो-खो खेळाडू कु गायत्री बोरकर १७ वर्षे शालेय राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात निवड झाली आहे.ही स्पर्धा २ डिसेंबर ते ७ डिसेंबर यादरम्यान नाशिक येथे होणार आहे. रणवीर राजे पंडित यांच्या संकल्पनेतून गेवराई येथे सुरू केलेले. शारदा स्पोर्ट्स अकॅडमीच्या मैदानावर ही खेळाडू दररोज सराव करते. या अकॅडमीची ही पहिली राष्ट्रीय खेळाडू आहे. या यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष माजी आ.अमरसिंह पंडित , शालेय समितीचे अध्यक्ष जि.प.माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित, शालेय समिती सदस्य श्याम (काका) येवले, गोरखनाथ शिंदे, दत्ताभाऊ दाभाडे, अक्षय पवार,धम्मपाल भोले,दिनेश घोडके, शेख मोसिन ,शाळेचे मुख्याध्यापक अंकुश तौर ,पर्यवेक्षक कोल्हे, क्रीडा शिक्षक विजय जाहेर, प्रा .राजेंद्र बरकसे, क्रीडा उपसंचालक कार्यालयाचे वरिष्ठ लिपिक दिपक जगदाळे,बापूसाहेब तारूकर, विजय अपसिंगेकर,डॉ .केतन गायकवाड या सर्वांनी स्पर्धेसाठी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

# देशातील शोषित पिढीतांना संविधानच न्याय देऊ शकते- प्रा. विक्रम धन्वे सर

चऱ्हाटा येथे धम्मदिप बुद्धविहारात संविधान दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी | चऱ्हाटा

चऱ्हाटा:दि. बीड तालुक्यातील मौजे चऱ्हाटा येथे मोठ्या उत्साहात संविधान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख वक्ते प्रा. विक्रम धन्वे हे होते तर प्रमुख उपस्थिती सामाजिक कार्यकर्ते संगमेश्वर आंधळकर ऍड. राजेश शिंदे, ऍड. तेजस वडमारे यांची होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून सामूहिक बुद्धवंदना घेण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारत देशाला जे संविधान दिले त्याविषयी सखोल मार्गदर्शन या कार्यक्रमासाठी निमंत्रित पाहुणे मा. प्रा. विक्रम धन्वे सर यांनी केले.



सर्व पाहुण्यांचे स्वागत धम्मदिप बुद्धविहार येथे गावातील नागरिक आणि महिलांनी केले

कार्यक्रमाचे प्रस्ताविक व आभार मुकेश ससाणे यांनी केले यावेळी प्रहार अपंग क्रांती आंदोलन जिल्हा बीड चे जिल्हा उपाध्यक्ष श्री शाहू (आप्पा) डोळस, सुदामभाऊ ससाणे, शिवाजी खंडागळे, माजी सरपंच हनुमान ससाणे, मनोज ससाणे, सुनील इंगोले, विजय साबळे, लहू ससाणे , भागवत साबळे, महादेव पवार, महेंद्र ससाणे, गौतम ससाणे, गंगाधर वाघमारे, ससाणे, किरण ससाणे, विशाल इंगोले, प्रतिक ससाणे, महादेव इंगोले, सूरज ससाणे, दादा ससाणे, सचिन खंडागळे, चंद्रभागा ससाणे, मंगल ससाणे, कुसुम ससाणे लक्ष्मी, सुरेखा, वर्षा, रमा, करुणा, आरती , व इतर बौद्ध उपासक उपासिका व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आधीच निसर्गाचा लहरीपणा त्यात पीक विम्याच्या साईटचा कहर

टाकरवन -वचिष्ट आठवे

केंद्र सरकारकडून प्रधानमंत्री पीक विमा योजना संपूर्ण देशात राबविण्यात येते. याआधी प्रधानमंत्री पीकविमा योजने अंतर्गत शेतकर्याना खरीप व रबी हंगामासाठी विमा संरक्षित रकमेच्या अनुक्रमे २ टक्के व १.५ टक्के हफ्ता भरावा लागायचा, यावर्षी राज्य शासनाने शेतकर्यांसाठी १ रुपयात पीकविमा योजना सुरू केली आहे. आता खरीप हंगाम संपला असुम रब्बी हंगाम सुरू झाला आहे, खरीप हंगामाप्रमाणे रब्बी हंगामात सुद्धा १ रुपयात पीक विमा योजना सुरू आहे. सोबतच राज्यात अवकाळी पावसाच थैमान सुरू आहे. आताच झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे रब्बी पिकांचे नुकसान सुद्धा झाले आहे. अशातच काही शेतकयांनी रब्बी पिकांचे नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान बधता रब्बी पिकांचा पीक विमा काढलेला आहे. तर काही उर्वरित शेतकरी पिक

विमा काढायचे बाकी आहेत. आज रब्बी हंगामातील रब्बी ज्वारीसाठी येत्या ३० नोव्हेंबरपर्यंत, गहू (बागायत), हरभरा आणि रब्बी कांदा या पिकांसाठी येत्या १५ डिसेंबरपर्यंत तर, उन्हाळी भात व उन्हाळी भुईमूग या दोन पिकांसाठी ३१ मार्च २०२४ पर्यंत अर्ज करता येणार आहेत. राज्य सरकारने यंदाच्या रब्बी हंगामापासून सर्वसमावेशक पीक विमा योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

### रब्बी पीक विम्याची साईट चालेना गेल्या चार दिवसापासुन विमा कंपनीच्या पोर्टल साईटची समस्या कायम




यानुसार आता विमा हप्त्याची शेतकरी हिश्श्याची रक्कम राज्य सरकार भरणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना आता केवळ १ रुपयांचा विमा योजनेचा लाभ घेता येणार आहे. परंतु पीक विम्याची साईट न चालल्यामुळे ज्वारीचा विमा काढण्यापासून शेतकरी वंचित राहू शकतो बासाठी शासनाने ज्वारी या पिकाच्या विमा काढण्याच्या तारखेत वाढ करून देण्यात यावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

पिक विमा योजना

चार दिवसांपासून साईट हँग

रब्बी हंगामातील पिकांचा पिक विमा काढण्यास सुरूवात झाली असुन आपल्या पिकांचा विमा काढण्या करता शेतकरी महा ई सेवा केंद्रावर गर्दी करत आहेत. परंतु गेल्या चार दिवसांपासुन रब्बी पिकविमा कंपनीचे पोर्टल साईट चालत नसल्याचे केंद्र चालकांकडून सांगण्यात येत आहे.

तारीख वाढविण्याची मागणी

चार दिवसांपासून पिक विम्याची साईट चालत नसल्याने व ज्वारी पिकाचा विमा काढण्याची शेवटची तारीख ३० नोव्हेंबर असल्यामुळे या पिकाचा विमा काढण्यापासुन हजारो शेतकरी वंचीत राहू शकता तरी कृषीमंत्री धनंजय मुंडे साहेब यांनी विमा काढण्याची तारीख वाढवण्या करता कंपनी कडे पाठपुरावा करावा अशी मागणी शेतकरी करत आहे.

ब्रम्हनाथ नाडे -महा ई सेवा केंद्र चालक (टाकरवन)

# आष्टी तालुक्यातील खुंटेफळ प्राथमिक आरोग्य केंद्र असून अडचण नसून खोळंबा : प्रा. ज्ञानदेव थोरवे

## परिचारिकेची नातेवाईकांशी उद्धटपणे वागणुक, कारवाईची मागणी

**धामणगांव | मराठवाडा दर्शन**

आरोग्य समस्या, त्याला होणारे त्रास, त्याचे नकारात्मक किंवा त्रासदायक विचार इ.जाणून घेऊन रुग्णाला व त्याच्या नातेवाईकांना रुग्णाच्या आजारातील वास्तविकता समजावून सांगणे, त्या समस्या सोडविण्याकरिता सक्रीय मदत करणे आणि रुग्णाला संवाद साधण्याचे कौशल्य शिकवून समाजाभिमुख बनण्यास प्रोत्साहन देणे हे परिचारिकेचे उपचारात्मक संबंध प्रकारातील मुख्य ध्येय असते. ह्या ध्येयाला हरताळ फासण्याचे काम आष्टी तालुक्यातील खुंटेफळ येथील सेवेत असलेल्या परिचारिका यांनी केलं असून आलेल्या रुग्णाशी व त्याच्या नातेवाईकांशी उद्धटपणे वर्तन करून तुम्ही नाटकं करीत असल्याचे त्यांनी सांगितले वास्तविक पाहता उपचारासाठी आलेल्या त्या चिमुकल्या हातावरील गंभीर जखम झालेली असताना वेळेत कामावर न येता परिचारका यांनी उपचार करण्याचे सोडून त्यांच्याशी वाद घालण्याचे काम केले व माझी पिंपळा येथे नियुक्ती झाली आहे असे उडवाउडवीची उत्तरे दिली.

याविषयी सविस्तर माहिती अशी की, आष्टी तालुक्यातील खुंटेफळ येथिल प्राथमिक आरोग्य केंद्रावर खुंटेफळ, कुंभेफळ, सोलापूरवाडी, कोयाळ, पिंपळा,लोणी सय्यदमीर पुंडी वाहिरा सह परिसरातील अनेक खेड्यांची भिस्त या प्राथमिक आरोग्य केंद्रावर आहे. मात्र इथे डॉक्टर वेळेवर उपस्थित राहात नसल्याने हे केंद्र असून अडचण नसून खोळंबा'' असून परिणामी रुग्णांची प्रचंड हेळसांड होत आहे.

वास्तविक पाहता या भागातील नागरिकांच्या आरोग्याचा भार व रुग्णासाठी उपचार सेवा यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र शासनाकडून चालवले जाते. या करीता आरोग्य विभागाकडून तज्ञ डॉक्टरांची रुग्ण सेवेसाठी नियुक्ती केल्या जाते. परंतु रुग्ण सेवेसाठी नियुक्त डॉक्टर आपल्या कर्तव्यपति निष्क्रिय असून कामाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात. शिवाय तेथील कोणताही कर्मचारी कधीच वेळेवर हजर रहात नसल्याचे दिसून येत आहे शासनाकडून कोट्यावधी रुपयांचा खर्च आरोग्य सेवार्थ होत आहे. मात्र असे निष्क्रिय व उद्धटपणे वागणाऱ्या परिचारिका हे शासनाचा गलेलठ्ठ पगार घेत कामचुकारपणा करत आहेत असा आरोप थोरवे यांनी केला आहे. शासन निर्णय नुसार सर्व शासकीय कर्मचाऱ्यांनी मुख्यालय राहण्याचे आदेश असतांना खुंटेफळ प्राथमिक आरोग्य केंद्रात एकही डॉक्टर, नर्स, मुख्यालयी राहत नसून तेथील साधा शिपाईसुध्दा सोयीच्या ठिकाणी राहत आहेत रुग्णालयात उशिरा येऊन रुग्णांवरच शिरजोरपणाची भाषा वापरून उद्धटपणे वागणूक मिळत असल्याची तक्रार तालुका वैद्यकीय अधिकारी



यांच्याकडे हर्षवर्धन थोरवे यांनी केली तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.जयश्री शिंदे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी या संदर्भात खुलासा मागवून दोषी आढळल्यास दोषींवर लवकरच रीतसर कारवाई करण्यात येईल असे सांगितले.

# अग्रीम पिकविमासह, शेतकऱ्यांच्या विविध प्रश्ना संदर्भात ७ डिसेंबर पासून चक्री उपोषण

**पाटोदा | मराठवाडा दर्शन**

**संपूर्ण बीड जिल्ह्यात भयावह दुष्काळच्या सावटाखाली असुन विहिरी, तलावातील पाणीसाठे मृतावस्थेत असुन जनावरांच्या चाऱ्यांचा प्रश्न गंभीर असुन जनावरांच्या दुधाला योग्य दर मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झाला असल्याने दि. १५ सप्टेंबर २०२३ रोजीच्या चुंबळी फाट्यावरील चक्काजाम आंदोलनाचा परिणाम म्हणून २५%अग्रीम पिकविमा देण्याची घोषणा मा.ना.कृषीमंत्री साहेबांनी जाहीर केलेली आहे. मात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर अद्यापपर्यंत जमा झालेला नाही.**

सध्याच्या परिस्थिती नुसार १००% पिकविमा देण्यात यावा तसेच बीड जिल्ह्यात दुष्काळ ग्रस्त घोषणा करण्यात आली मात्र कोणत्याही उपाययोजना करण्यात आली नसल्याने हा सगळा प्रकार शासनाचा बोलाचीच कढी व बोलाचाच भात असा प्रकार दिसून येत आहे.तसेच पैठण-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाचे काम जाणीवपूर्वक अपुरे ठेवले असुन याविरोधात भारतीय कम्युनिस्ट व किसान सभेच्या वतीने पाटोदा, शिरूर तालुक्यात ६ चक्काजाम आंदोलन व धरणे आंदोलन करण्यात आल्यानंतर फक्त चुबंळी फाट्यावरील चौफुल्याचे काम पुर्ण करण्यात आले मात्र शिल्लक कामे लोकप्रतिनिधी व अधिकारी,गुत्तेदाराच्या मिलीभगत असल्याने ते पुर्ण करण्यात आले नसल्याचे आरोप भारतीय कम्युनिस्ट पक्ष,किसान सभा,शेकापच्या वतीने करण्यात आला असुन तात्काळ याकडे लक्ष घालावे नसता ७ डिसेंबर गुरुवार पासून बेमुदत साखळी उपोषण करण्यात येईल असा इशारा मा.मुख्यमंत्री, मा.कृषीमंत्री धनंजय मुंडे, मा.जिल्हाधिकारी साहेब, मा.कार्यकारी अभियंता यांना मा. तहसीलदार साहेब यांच्या मार्फत



## रस्त्याचं रखडलेल्या काम कधी होणार ?

निवेदन देण्यात आले या निवेदनावर कॉ.महादेव नागरगोजे, भाई विष्णुपंत घोलप,चंक्रपाणी जाधव,कॉ.राजाभाऊ देशमुख,कॉ.भगवान जावळे,कॉ.सुधाकर सिरसट,कॉ.विठ्ठल पवळ,कॉ.आत्माराम राख,भागवत नागरे,शेख इलियास भाई, गोकुळ नागरगोजे,विजय बिनवडे,कॉ.भगवान पवळ,राजेंद्र जायभाय आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत..

# आंदोलकांवरील सर्व गुन्हे मागे घ्या

## अन्यथा ५ कोटी मराठ्यांना अटक करा ; मनोज जरांगेंचं सरकारला थेट आव्हान

जालना: आंदोलकांवरील सर्व गुन्हे दोन दिवसांत सर्व गुन्हे मागे घ्या नाहीतर, पाच कोटी मराठ्यांना अटक करा, असा इशारा मनोज पाटील जरांगे यांनी शुक्रवारी येथील सभेत राज्य सरकारला दिला. गुन्हे मागे घेतले जातील, असे उदय सामंत, धनंजय मुंडे, संदीपान भुमरे आणि अतुल सावे या चार मंत्र्यांनी सांगितले होते. असे असताना अंतरवालीतील कार्यकर्त्यांना का अटक केली, असा प्रश्न त्यांनी जालना येथील सभेत शुक्रवारी केला.

मराठा समाजाच्या ओबीसी आरक्षणाच्या नोंदी सापडल्या आहेत. तरी आरक्षण न देण्याचा चंग बांधला आहे. सत्तर वर्षे सरकार दबावाखाली आले. नोंदी दाबून ठेवल्या, आरक्षण मिळू दिले नाही. छगन भुजबळ हे सर्वांत कलंक असलेले मंत्री आहेत. घटनेच्या पदावर बसून सरकारबरोबर राहून महापुरुषांच्या जाती ते काढत आहेत, हा राजद्रोहाचा प्रकार आहे असा आरोप जरांगे यांनी केला. ओबीसी प्रवर्गातील खालच्या जातीवर भुजबळ यांनी अन्याय केला आहे. धनगर बांधवांच्या आरक्षणाबाबत ते भूमिका स्पष्ट करीत नाहीत, असा आरोप त्यांनी केला.

'सर्व जातींचे सर्वेक्षण व्हावे'

आयोगाचे सदस्य बालाजी सागर किल्लारीकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा आयोगाच्या अध्यक्षांकडे दिला आहे. 'राज्यात सध्या सुरू असलेल्या आंदोलनामुळे राज्याची अधोगती होत असून, वेगवेगळ्या जातींमध्ये मतांचे राजकारण सुरू आहे. त्यातून समाजाची हानी होत आहे. सत्य परिस्थिती समजून सांगण्यासाठी राज्य सरकारकडून पुरेसे प्रयत्न होत नसल्याचे जाणवल्याने मी राजीनामा दिला आहे,' असे किल्लारीकर यांनी स्पष्ट केले. सर्वेक्षणावरून आयोगाच्या सदस्यांमध्ये मतभेद असल्याची कबुली देऊन, वैचारिक मतभिन्नता असू शकते याकडे त्यांनी लक्ष वेधले.

राज्यात बिघडलेले सामाजिक वातावरण सुधारण्यासाठी संपूर्ण समाजाची जातनिहाय जनगणना झाली पाहिजे अशी मागणी केली. त्या आधारे प्रत्येक घटकाला नोकरी, शिक्षण; तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये किती प्रतिनिधित्व आहे हे कळू शकेल.

– ॲड. बालाजी सागर किल्लारीकर, सदस्य, मागासवर्ग आयोग

### ब्राह्मण समाजाच्या उपोषणस्थळी भेट

ब्राह्मण समाजाच्या परशुराम आर्थिक महामंडळाच्या मागणीसाठी उपोषणाला बसलेल्या दीपक रणनवरे यांची भेट घेऊन जरांगे पाटील यांनी त्यांना पाठिंबा दिला. भगवती पुरोहित संघ, मुस्लिम समाज यांच्यासह अनेक संस्था आणि संघटनेच्या वतीने जरांगे पाटील यांचे स्वागत करण्यात आले.

### जोरदार स्वागत

छत्रपती संभाजीराजे यांच्या पुतळ्यास हार अर्पण करून मनोज पाटील जरांगे यांची फेरी कचेरी रोड, महात्मा गांधी पुतळा, मंबादेवी, सुभाष चौक, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, बाजारपेठ, भोकरदन नाकामार्गे गोरक्षण पांजरापोळ येथे पोचल्यानंतर त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. फेरीच्या मार्गावर सव्वाशेहून अधिक जेसीबीच्या साह्याने पुषवृष्टी करण्यात आली. अनेक चौकात पोकलॅनच्या साह्याने मोठे पुष्पहार घालून त्यांचे स्वागत करण्यात आले.



# 'मिचॉन्ग' चक्रीवादळाचा धोका!

## महाराष्ट्रासह अनेक राज्यात पावसाचा अंदाज; 'या' भागात ऑरेंज अलर्ट

**बीड | मराठवाडा दर्शन**

बंगालच्या उपसागरात तयार झालेले कमी दाबाचे क्षेत्र आणि वेस्टर्न डिस्टर्बन्स यामुळे हवामानात मोठा बदल होताना दिवस आहे. राज्यासह देशभरात अनेक ठिकाणी अवकाळी पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. पुढील २४ तासांत बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्याचं चक्रीवादळ तयार होण्याची शक्यता आहे. २ ते ४ डिसेंबर या काळात देशात अनेक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. त्यामुळे आज आणि उद्या महाराष्ट्रासह राज्यात अनेक ठिकाणी पावसाची हजेरी पाहायला मिळणार आहे.

भारतीय हवामानशास्त्र विभागाने (खचऊ) दिलेल्या माहितीनुसार, दक्षिणपूर्व बंगालच्या उपसागरात तयार झालेले कमी दाबाचे क्षेत्र पुढील २४ तासांत अधिक तीव्र होण्याची अपेक्षा आहे. पुढील २४ तासांत बंगालच्या उपसागरात चक्रीवादळ तयार होण्याची शक्यता आहे. या हवामानामुळे पुढील दोन दिवसांत मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रात विजांच्या गडगडाट आणि वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. याशिवाय, वेस्टर्न डिस्टर्बन्सचा प्रभावही कायम राहणार आहे, यामुळे पर्वतीय प्रदेशात बर्फवृष्टी होईल आणि लगतच्या मैदानी प्रदेशात थंडीची लाट येईल.

पुढील २४ तासांत चक्रीवादळ



तयार होण्याची शक्यता

१ डिसेंबर रोजी पहाटे ५:३० वाजता दक्षिण-पूर्व लगतच्या नैऋत्य बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचे क्षेत्र तयार झालं आहे. हे कमी दाबाचे क्षेत्र चेन्नईच्या ८०० किमी आग्नेय, पुद्दुचेरीच्या सुमारे ७९० किमी पूर्व-दक्षिणपूर्व अक्षांश ९.१ अंश उत्तर आणि रेखांश ८६.४ अंश पूर्वेजवळ दक्षिणपूर्व शेजारील नैऋत्य बंगालच्या उपसागरावर केंद्रित झालं आहे. हे कमी दाबाचे क्षेत्र पुढील २४ तासांत चक्रीवादळात रुपांतरित होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. यामुळे दक्षिण आंध्र प्रदेश आणि लगतच्या उत्तर तामिळनाडू किनारपट्टीला याचा धोका आहे, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकल किनारपट्टीसाठी हवामान कार्यालयाकडून ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. २ ते ४ डिसेंबर या काळात मुसळधार पावसाची शक्यता आहे. तामिळनाडूतील चेंगलपट्टू, कांचीपुरम आणि तिरुवल्लूर जिल्ह्यात जोरदार पाऊस होणयाची शक्यता आहे. ४ डिसेंबरपर्यंत उत्तर किनारपट्टीवरील तामिळनाडू आणि पुद्दुचेरीमध्ये बहुतेक ठिकाणी मुसळधार पावसासह हलका ते मध्यम पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे. २ ते ४ डिसेंबर दरम्यान मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. ३ आणि ४ डिसेंबरला आंध्र प्रदेशात दक्षिण किनारपट्टी भागात अनेक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. बहुतेक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# हर्सूल तलावाची पाणीपातळी १६ फुटांवर:अवकाळीचा असाही फायदा, शहरातील १४ वॉर्डांचा पाणीप्रश्न काही अंशी मिटला

**बीड | मराठवाडा दर्शन**

अपुऱ्या पावसामुळे यंदा हर्सूल तलाव भरला नाही. जानेवारी अखेरीपर्यंत तो आटण्याची शक्यता होती. शुक्रवारी मध्यरात्रीपासून पहाटेपर्यंत झालेल्या अवकाळी पावसामुळे हर्सूल तलावात चार फूट पाणी वाढले असून पातळी १६ फुटांवर पोहोचल्याचे कार्यकारी अभियंता के. एम. फालक यांनी सांगितले. त्यामुळे या तलावातून पुरवठा होणाऱ्या १४ वॉर्डांचा पाणीप्रश्न काही अंशी मिटेल.

यंदा कमी पाऊस झाल्यामुळे हर्सूल तलावात पाणी आले नाही. ऑक्टोबर महिन्यात हर्सूल तलावाची पातळी ११ फुटांवर होती. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात हर्सूल तलाव कोरडा पडणार, अशी शक्यता वर्तवली जात होती. तरीही मनपाकडून हर्सूल तलावातून १४ वॉर्डांना पाणीपुरवठा केला जातो. गेल्या चार दिवसांपासून होत असलेल्या पावसामुळे तलावाच्या पाणीपातळीत गुरुवारी १२, तर शुक्रवारी १६ फुटांपर्यंत वाढ झाली. अजूनही तलावात पाण्याचा ओघ सुरूच आहे. ४ फूट पाणी वाढल्याने १४ वॉर्डांना ऐन उन्हाळ्यातही पुरवठा करण्यासाठी दिलासा मिळाला असल्याचे कार्यकारी अभियंता फालक यांनी सांगितले.


# आजपासून ४३ वे मराठवाडा साहित्य संमेलन

## उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या हस्ते उद्घाटन; गंगापूरमध्ये रंगणार नानाविध कार्यक्रम

**बीड | मराठवाडा दर्शन**

मराठवाडा साहित्य परिषद व मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित मुक्तानंद महाविद्यालयातर्फे आयोजित दोन दिवसीय ४३ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाला आजपासून येथील महाविद्यालयाच्या प्रांगणातील कविवर्य ना.धों. महानोर साहित्यनगरीत प्रारंभ होत आहे.

यानिमित्त सकाळी शहरातील प्रमुख मार्गांवरून ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. त्याचे उद्घाटन रमेश पाटील डोणगावकर यांच्या हस्ते होईल. याशिवाय साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे ग्रंथनगरीचे उद्घाटन मागील साहित्य संमेलनाचे अध्यक्ष शेषराव मोहिते यांच्या हस्ते होणार आहे. संमेलनस्थळी उभारलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यासपीठावर साहित्य संमेलनाचे उद्घाटन संमेलनाध्यक्ष प्रा.डॉ. जगदीश कदम यांच्या उपस्थितीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणार




आहे. यासाठी साहित्यातील नामवंत कवी, लेखक यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

दुपारी १.३० ते ३.३० निमंत्रितांचे कविसंमेलन देविदास फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली होईल. त्यामध्ये मराठवाड्यातील नामवंत कवी सहभागी होणार आहेत. दुपारी २ ते ४ दरम्यान, म्हणून मी लिहितो/लिहिते' या विषयावर परिसंवाद होईल. अध्यक्षस्थानी उमरखेड येथील विठ्ठलराव कदम यांची उपस्थिती असेल. दुपारी ३.३० ते ५.१५ या वेळेत सत्यशोधक चळीवळीची दीडशे वर्षे' या विषयावरील परिसंवादात प्रल्हाद लुलेकर अध्यक्ष असतील. दुपारी ४.०० ते ५.३० आठवणींचे पक्षी' विषयावर परिचर्चा असेल. अंबाजोगाई येथील कमलाकर कांबळे, चेतना सोनकांबळे, रामनाथ वाढे, माणिक पुरी यांची उपस्थिती राहणार आहे.

# दोन दिवसांत सर्व गुन्हे मागे घ्या, अन्यथा गाठ मराठ्यांशी:जालन्याच्या सभेत जरांगे पाटलांचा सरकारला इशारा

**बीड | मराठवाडा दर्शन**

जालना -सरसकट मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे या मागणीसाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांची शुक्रवारी जालन्यात विराट सभा झाली. या वेळी त्यांनी राज्याचे कॅबिनेट मंत्री छगन भुजबळ यांच्यासह सरकारचा कडक शब्दात समाचार घेतला. 'सरकारने दिलेल्या आश्वासनानुसार आंतरवली सराटीसह राज्यभरातील सर्व मराठा आंदोलकांवरील गुन्हे दोन दिवसांत मागे घ्या. तसेच २४ डिसेंबरपर्यंत विनाअट आरक्षण द्यावे अन्यथा गाठ मराठ्यांशी आहे', असा इशारा त्यांनी दिला. दरम्यान, सरकारने दिलेल्या मुदतीत आरक्षण न दिल्यास १७ डिसेंबर रोजी आंतरवालीत बैठक घेऊन आंदोलनाची पुढील दिशा ठरवली जाईल,' असेही त्यांनी जाहीर केले.भाजप आमदार नारायण कुचे, कृषीमंत्री धनंजय मुंडे यांचाही जरांगे पाटील यांनी समाचार घेतला. राज्य सरकार कुणा



एकट्याच्या दबावाखाली येऊन जर मराठ्यांशी दगाफटका करत आहे. मात्र आरक्षण मिळाल्याशिवाय आम्ही मागे हटणार नाही,' असे त्यांनी ठणकावून सांगितले. 'सरकारला अन् पोलिसांना आम्ही आतापर्यंत सहकार्यच केले आहे. मात्र यापुढे अपेक्षा ठेऊ नये. आमच्यावर लाठीमार करण्याऱ्या पोलिस अधिकाऱ्याला बडतर्फ करण्याऐवजी त्यांना बक्षीस म्हणून बढती देण्यात आली. गुन्हे मागे घेण्याचे आश्वासन पाळले नाही.

# तीन डिसेंबर [ जागतिक अपंग दिन स्पेशल ]

**बीड जिल्ह्यातून नवनाथ आडे (निर्भीड पत्रकार) तरी यवतमाळ जिल्ह्यातून स्वप्नील गोरे (युवा कवी/लेखक)यांचा प्रेरणादायी जीवन प्रवास आज ०३ डिसेंबर म्हणजेच जागतिक अपंग दिन म्हणून हा दिवस साजरा केला जातो या जागतिक अपंग दिनाचे उद्दिष्ट म्हणजेच दिव्यांगांबद्दल सहानुभूती दाखवणे आणि त्यांच्या विविध समस्या जाणून घेऊन त्यांच्यावर कायदेशीर उपाययोजना करून त्यांच्या न्याय हक्कासाठी लढा देणे हा आहे दिव्यांग व्यक्ती समाजात वावरत असताना त्यांना विविध गोष्टीचा चांगला वाईट अनुभव येत असतो आणि त्यांच्यावर कळत नकळतपणे कुठेतरी अन्याय होत्या ना दिसतो तरीपण दिव्यांग बांधव आपल्या जीवनामध्ये संघर्ष करीत आपल्या आयुष्य जगण्याचा प्रयत्न करतोय.**

आजच्या लेखाच्या माध्यमातून सर्वांना दोन दिव्यांग व्यक्तीचा परिचय करून देऊन त्यांच्या जीवनात चालू असलेला संघर्ष किंवा त्यांचे विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य याची माहिती व्हावी किंवा दिव्यांग व्यक्ती सुद्धा कुणापेक्षा कमी नाही त्याने विचार केला तर आपल्या कमजोरीला आपली ताकद बनवून निश्चित क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य घडून आणू शकतो आणि याच उदाहरण म्हणून आज दोन व्यक्तीचा परिचय करून देण्यासाठी हा लेख.

बीड जिल्ह्यातील नवनाथ आडे हे अस्थिव्यंग या प्रवर्गामध्ये मोडतात तरीपण ते आपल्या अपंगत्वाला बाजूला ठेवून पत्रकारिता क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करताना सातत्याने दिसून येतात जवळपास तीन वर्षापासून नवनाथ आडे हे पत्रकारिता क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत आणि आपल्या लेखणीच्या माध्यमातून अन्यायाविरुद्ध वाचा फोडण्याचा नेहमीच प्रयत्न करतात आणि भ्रष्टाचार विरोधात आवाज उठवतात सर्वसामान्य जनतेचे प्रश्न आणि सर्वसामान्यांचे बाजू पत्रकारितेच्या माध्यमातून राज्यकर्त्यांपर्यंत पोहोचवतात असे म्हणतात की तलवारीच्या धारेपेक्षाही तीक्ष्ण हे पेणचे टोक असते आणि याचा पुरेपूर वापर करून बीड जिल्ह्यामध्ये आपला पत्रकारितक्षेत्रेत वेगळाच ठसा त्यांनी उमटवला आहे. आणि पत्रकारिता हे लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहे आणि यांच्या लेखणीतून सतत योग्य ते वार्तालाप





होत असते आणि विशेष म्हणजे दिव्यांग असूनही निर्भीडपणे कुठल्याही आमिषाला बळी न पडता किंवा कुठल्याही धमकीला न जू आपल्या पवित्र लेखणीच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे प्रश्न मांडत असतात.

तरी यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील सावरगाव गोरे येथील रहिवासी म्हणजेच कवी लेखक स्वप्निल गोरे हे डोळ्याने ७५ टक्के अंध असून सध्या शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती येथे एम ए मराठी मध्ये शिक्षण घेत आहेत घरची परिस्थिती अगदी बेताची असून त्यांचे दोघेही बंधू इतरांच्या शेतामध्ये रोज मजुरीवर आपल्या घराचा उदरनिर्वाह करीत असतात आणि स्वप्निल गोरे यांच्या शिक्षणाचा खर्च हे दोघे भाऊच पाहतात घरची घरी परिस्थिती आणि डोळ्यांनी अपंगत्व तरीसुद्धा निराशेने खचून न जाता आपला संघर्षमय प्रवास त्यांचा चालूच आहे आणि मुळात स्वप्निल गोरे यांना साहित्याची आवड असून ते मुक्तछंद प्रकारामध्ये कविता लिखाण करतात शिक्षणाबरोबरच आपल्या अंगी असलेला कलागुणांना सुद्धा महत्त्व देऊन कविता आणि विविध लेखांचे लिखाण आणि तेही अपंग असून सुद्धा त्यांना बऱ्याचदा सांगितलं जायचं की तू अपंग आहेस आणि तुझी परिस्थिती शिकन्या योग्य नाही तू काय तुझी प्रगती करणार? पण लोकांच्या अशा बोलण्याने ते खचून गेले नाही व त्यांच्या दोन्ही भावाच्या सहकार्याने ते आपले शिक्षण पूर्ण करीत आहेत आणि विविध शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या ध्येयाकडे वाटचाल करीत आहेत त्यांचा हा संघर्षमय जीवनप्रवास सुरू आहे.

समाजामध्ये बरेच दिव्यांग पाहायला मिळतात परंतु ते कुठेतरी आपला आत्मविश्वास गमावून बसतात किंवा समाजातील इतर व्यक्तींकडून त्यांना निगेटिव्ह करून सोडल्या जातात त्यामुळे ते खचून जातात आणि आपला संघर्षमय प्रवास तिथेच थांबवतात पण या दोघांनी ऐकावे जनाचे करावे मनाचे या युक्तीप्रमाणे इतरांच्या एकूण ते मनामध्येच दडपून ठेवले आणि आपल्याला क्षेत्रामध्ये त्यांनी आपापले कार्य सुरू केले त्यामुळेच आज त्यांच्या कार्याची दखल किंवा त्यांच्या संघर्षमय प्रवासाचा थोडा भाग या लेखाच्या माध्यमातून आपणांसमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे.



## सामाजिक उपक्रमांनी ॲड. अविनाश दादा धायगुडे यांचा आसरडोह येथे वाढदिवस साजरा

बीड । प्रतिनिधी

दरवर्षी १ डिसेंबर रोजी युवकांचे नेते, संविधान अभ्यासक मा अविनाश दादा धायगुडे यांचा वाढदिवस मौजे आसरडोह येथे विविध सामाजिक उपक्रमांनी केला जातो. या वर्षी देखील चौथ्या वर्षी अविनाश दादा युवक मित्र परिवार तर्फे प्राथमिक शाळेत विविध शैक्षणिक साहित्य वाटप करून करण्यात आला आहे. वाढदिवस च्या दिवशी इतर खर्च न करता अविनाश धायगुडे मित्र परिवार दरवर्षी १ डिसेंबर ला अशा विविध उपक्रमांनी वाढदिवस साजरा करून एक वेगळा सामजिक आदर्श परिसरात घातला आहे. अविनाश दादा धायगुडे हे तरुण गेली अनेक वर्षांपासून महाराष्ट्र मध्ये आपल्या व्याख्यानाच्या माध्यमातून सर्व बहुजन महामानवांचे विचार महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात घेऊन गेले आहेत. यिन सकाळ माध्यमातून त्यांनी शेतकरी आणि त्यांच्या प्रश्नावर आवाज उठवत लाखो तरुण शेतकऱ्यांच्या मनात घर केले आहे. आसरडोह आणि परिसरातील युवक मित्र दरवर्षी १ डिसेंबर दिवशी विविध सामाजिक उपक्रमांनी वाढदिवस साजरा करत असतात. या वर्षी जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य वाटप करून वेगळा आदर्श घालून दिला आहे.

## शासन आमच्या दारी कधी येणार ??

### मुळुकवाडीकरांचा सवाल कांदा पिकाचे नुकसान, महसूल प्रशासन झोपेत :- डॉ.गणेश ढवळे

गेवराई । प्रतिनिधी

बीड तालुक्यात २८६.६ हेक्टर क्षेत्रावरील भाजीपाल्यासह रब्बी पिकांचे नुकसान झाले आहे.वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसाने बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील शेतकऱ्यांचे कांदा पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.शेतात मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने पिके पिवळी पडु लागली आहेत.मात्र महसूल प्रशासनाला अजुन जाग आलेली नाही कारण अद्याप महसूल प्रशासनाचा कोणीही अधिकारी अथवा कर्मचारी या नुकसानीचे पंचनाम करण्यासाठी आलेला नाही.याबद्दल शेतकऱ्यांमध्ये तिव्र संतापाची भावना आहे शासन यांच्या दारी कधी येणार या प्रतिक्षेत कांचन अंकूश ढास विचारणा करत आहेत.१२०० लोकसंख्या असलेल्या मुळुकवाडी गावात ७५ टक्के शेतकरी



कांद्याचे पिक घेतात.गावातील सगळा कांदा बेंगलोर येथे विक्रीसाठी जातो.एकरी ५० हजार रुपये कांद्याला खर्च येत असुन या ३ एक्कर कांद्याच्या प्लाटमध्ये साधारणतः ३ लाख रुपयांचे उत्पन्न अपेक्षित होते.मात्र अवकाळी पावसाने मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.सरकार शासन आपल्या दारी जरी म्हणत असले तरी ३ दिवस झाले महसूल विभागाचा कोणीही अधिकारी, कर्मचारी नुकसान बघायला शेतात आलाच नाही.एवढंच काय आम्हाला तलाठी कोण आहे हेच माहित नाही कारण गावात येतच नाही.

दुष्काळात रात्र रात्र जागुन दारे धरून मोठ्या कष्टाने कांद्याचं पिकं आणलं होतं.अवकाळी पावसाने सगळं मातीमोल झाले आहे.कांदा पिवळा पडुन नासायला लागल्याने काढायची वेळ आली.सरकारने आमच्या कांदा पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी.

पिक विमा भरण्यासाठी ३० नोव्हेंबर शेवटची तारीख होती. ऑनलाइन पिक विमा भरणाऱ्यांचे धावपळ सुरू आहे मात्र गेल्या अनेक दिवसापासून साईट सुरळीत चालत नसल्याने व अतिशय संत गतीने नेट चालत असल्याने दिलेल्या मुदतीमध्ये अनेक शेतकरी पिक विमा भरण्यापासून वंचित राहिलेले आहेत. त्यामुळे रब्बी पिक विमा भरण्यासाठी शासनाने आणि सदर कंपन्यांनी तारीख वाढवून देण्याची मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे.ग्रामीण भागातील शेतकरी ऑनलाइन सेंटर मध्ये पिक विमा भरण्यासाठी कागदपत्रे घेऊन येतात मात्र नीट सुरळीत नसल्याने अनेक शेतकऱ्यांना चकरा माराव्या लागत आहेत.

रब्बी पिकाचे अवकाळी पाऊस व गारपिटीने नुकसानीची

## ऑनलाइन नोंदणी तात्काळ कराव्यात- अशोक हिंगे पाटील

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्यातील तसेच बीड जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी अवकाळी पाऊस व गारपिटीने कापूस,तुर आणि कांदा पिकांच्या झालेल्या नुकसानीच ऑनलाईन तक्रार तात्काळ कराव्यात असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे पाटील यांनी केले आहे.सध्या अवकाळी पाऊस व गारपीटने कापूस, तूर व खरीप कांदा पिकाचे नुकसान झालेले आहे. शेतकऱ्यांनी ऑनलाईन तक्रार केल्या आहेत. त्यात काही विशिष्ट गावातील शेतकऱ्यांनी जास्त तक्रारी आल्या आहेत. इतर गावांमध्ये याबाबत काही गांभीर्य नाही. तक्रार केली तरच



पीकविमा नुकसान भरपाई मिळेल. पुन्हा वेळ निघून गेल्यावर काही उपयोग नाही एकरी ३ ते ५ हजारांचे नुकसान करून घेऊ नका.. उद्याच्या दिवस वेळ आहे खरिपाची लीं ळपींीरपलश या पव्दारे ींपीशरीपरश्र ीरळप या द्वारे ऑनलाईन तक्रार केली तरचं आपल्याला भविष्यात मदत मिळणार आहे, आपल्या गावातील शेतकरी,मित्र,शेती असलेले पाहुणे, यांना या बाबत तात्काळ कळवावे, त्यांना एकरी हजारोंची मदत मिळू शकते.तसेच सर्व शेतकरी बांधवांनी रब्बी हंगामातील पीकांचा देखील पिक विमा भरून घ्यावा असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे पाटील यांनी केले आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनी अभिवादन करून वही-पेन दान अभियान

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील महामानव अभिवादन ग्रुप गेल्या दोन वर्षापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनापासून बीड शहरातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी वही-पेन (शालेय साहित्य) वाटपाचा कार्यक्रम राबवीत आहे. यावर्षी देखील डॉ. बाबासाहेबांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनी अभिवादन करून शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम राबविण्याचे ठरविले आहे. तरी अभिवादनास येणाऱ्या सर्वांनी डॉक्टर बाबासाहेबांच्या पुतळ्यास अभिवादन करून गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य म्हणून वही, रजिस्टर, पेन किंवा रोख रकमेच्या स्वरूपात दान करावे ही आग्रहाची विनंती आहे. ६७ व्या महापरिनिर्वाण दिनी मिळालेल्या




दानातून १०६२ गरजू विद्यार्थ्यांना १०८० (रजिस्टर,वही) व १०७९ पेनचे बीड शहरातील विविध १८ ठिकाणी २५/१०/२०२३ पर्यंत वाटप केले आहे. यावर्षीही मिळालेल्या दानाचे साहित्य वाटपाचा कार्यक्रम वर्षभर राबविण्यात येणार आहे. तरी या उपक्रमास भरघोस सहाय्य करावे ही विनंती करण्यात येत आहे.



## माजी मंत्री राजेश टोपेंच्या कारवर हल्ला

प्रतिनिधी जालना

जालना जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालक आणि उपसंचालकपदाची निवड होती. ही निवड बिनविरोध झाली होती. मात्र या दरम्यान काही जणांनी राजेश टोपे यांच्या कारला लक्ष्य केलं.हल्ला झाला त्यावेळी कारमध्ये राजेश टोपे यांचा चालक होता. राजेश टोपे हे निवडणूक प्रक्रियेसाठी बँकेत गेले होते. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. या घटनेत कुणीही जखमी झालेलं नाही.

हल्ल्यादरम्यान कारवर शाई, दगड फेकण्यात आले. या हल्ल्यात राजेश टोपे यांच्या कारचेही नुकसान झालं आहे. निवडणूक बिनविरोध झालेली असताना काही लोकांनी हिंसक मार्ग पत्करला. ज्या लोकांनी कायदा हातात घेतला त्याच्याविरोधात कायदेशीर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी राजेश टोपे यांनी केली आहे



## नुकसानीची पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी बांधावर

प्रतिनिधी बीड

बीड : गेल्या तीन दिवसांपासून बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात अवकाळी पाऊस पडत आहे. या पावसाने जिल्ह्यातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. नुकसानग्रस्त पिकांची पाहणी जिल्हाधिकरी दीपा मुधोळ-मुंडे यांनी केली.बीड जिल्ह्यात अवकाळी पावसाने कापूस, ज्वारी, भाजीपाला यासह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. पिकांचे पंचनामे करण्याचे आदेश राज्य सरकारने महसूल विभागाला दिले. आज जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांनी सफेपूर येथील नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. या वेळी त्यांच्या समवेत तहसीलदार सुहास हजारे, कृषी अधिकारी जेजूरकर यांच्यासह आदी कर्मचार्यांची उपस्थिती होती.

## परळी पोलीस हातबल ,अनेक वेळा दारू बंदीचे निवेदन, ठोस कारवाई नाही?

### भीमनगर साठेंनगर नागरिकांचा आता आमरण उपोषणाचा मार्ग! परळी अवैध धंदे- हातभट्टी बंदीसाठी ठाण्यासमोर दोन वेगवेगळे आमरण उपोषण!

परळी । प्रतिनिधी

परळी शहरातील मोठे दलित वस्ती असलेले भिमनगर व साठेनगर येथील हातभट्टी दारु कायम स्वरूपी बंद करण्यात यावी या मागणी साठी या भागातील असलेले सर्व पक्षीय नेते व कार्यकर्ते दिनांक १/१२/२०२३रोजी परळी शहर पोलीस स्टेशन व संभाजी नगर पोलीस स्टेशन परळी समोर आमरण उपोषण करणार असल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आली आहे, याबाबत सविस्तर माहिती अशी आहे की ,परळी शहरातील भिमनगर व साठेनगर येथील सर्व हातभट्टी दारू




विकणे बंद करावी यासाठी लेखी निवेदन परळी शहर पोलीस व संभाजीनगर पोलीस यांना दिनांक १४/१०/२०२३ रोजी दिले असता थातर मातर कारवाई करण्यात आली.कुठलीही ठोस कारवाई करण्यात आली नाही, म्हणुन दिनांक २/११/२०२३ रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक बीड यांना प्रत्यक्ष भेटुन परत त्यांना लेखी निवेदन देण्यात आले आहे, त्याचा ही कांही फरक पडलेला दिसत नाही ,हातभट्टी दारू विकणे चालुच आहे,बीड पोलीस अधीक्षक यांनी यावर कारवाई करायाला पाहिजे होती पण केली नाही,याकडे जाणूनबुजून दलित वस्ती असल्याने दुर्लक्ष केले जाते आहे, सदरील हातभट्टी दारू अशीच चालु राहिली तर येथील गोरगरिबांचे संसार उध्वस्त होऊन,संसार उघड्यावर येईल,तर तरुणाचे जीवन उध्वस्त होईल,म्हणुन अशा समाजात विष हातभट्टी दारू स्वरूपात विकणाऱ्यावर एमपीडिए अंतर्गत गुन्हे दाखल करून याठिकाणीची हातभट्टी कायम दारू बंद व्हावी म्हणून या परिसरात एक पोलीस चौकी उभारावी अशी मागणी सुद्धा, दिलेल्या निवेदनात केली असून अनेक वेळा निवेदन देऊन ही कारवाई शून्य असल्याने परळी पोलीस निरीक्षक ते बीड याचा अर्थपूर्ण कानाडोळा आहे का असा प्रश्न निर्माण होतो पोलीस कारवाई का करत नाहीत अशी काय अडचण पोलिसांना येत आहे की ठोस कारवाई होत नाही या सर्व भीमनगर साठेनगर नागरिकांची अनेक वेळा निवेदन देऊन ,मोर्चा काढून सुद्धा दखल न घेतल्यामुळे नाकरिकांनी पोलीस ठाण्यासमोर आमरण उपोषण करण्याचा घेऊन तसे निवेदन सर्व शासकीय कार्यलयाना देऊन आज १/१२ /२३ शुक्रवार पासून उपोषण सुरू करण्यात आले आहे

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT